**पीएच.डी सारांश**

**नंदुरबार प्रकल्पातील खाजगी व शासकीय आश्रमशाळांचा तुलनात्मक अभ्यास करून गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी उपाययोजना एक अभ्यास.**

**डॉ. पी ओ चौधरी**

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. नंदुरबार प्रकल्पातील खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सोयी सुविधांचा अभ्यास करणे.
२. नंदुरबार प्रकल्पातील खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्थेचा अभ्यास करणे.
३. नंदुरबार प्रकल्पातील खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन आहाराविषयी अभ्यास करणे.
४. नंदुरबार प्रकल्पातील खाजगी आश्रमशाळांना मिळत असलेल्या अनुदानाचा विनियोगाविषयी अभ्यास करणे.
५. नंदुरबार प्रकल्पातील खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या वैद्यकीय सुविधांचा अभ्यास करणे.
६. नंदुरबार प्रकल्पातील खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी आवश्यक सुविधांचा अभ्यास करणे.
७. नंदुरबार प्रकल्पातील खाजगी व शासकीय आश्रमशाळांच्या गुणात्मक दर्जा अभ्यासणे.

**संशोधन विषयक परिकल्पना :**

**मुख्य परिकल्पना :**

खाजगी आश्रमशाळा व शासकीय आश्रमशाळा यांच्या कर्यपध्दतीत फरक नाही.

**उपपरिकल्पना :-**

१. खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील शैक्षणिक सोयीसुविधांमध्ये फरक नाही.
२. खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थी निवास व्यवस्थेत फरक नाही.
३. खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन आहारात फरक नाही.
४. खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील वैद्यकीय सुविधांमध्ये फरक नाही.
५. खाजगी व शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकास सुविधांमध्ये फरक नाही.
६. खाजगी व शासकीय आश्रमशाळांच्या गुणात्मक दर्जात फरक नाही.

**पद्धती :**

सर्वेक्षण पद्धती ही वर्तमानकाळाशी संबंधित असते. संशोधकाने संशोधनासाठी निवडलेली समस्या वर्तमानकालिन आहे. ती शासकीय व खाजगी अनुदानित आश्रमशाळांच्या समस्याबाबत आहे. त्यामुळे संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीची निवड केली आहे.

**न्यादर्श :**

प्रस्तुत संशोधनासाठी उपरोक्त तक्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे नंदूरबार प्रकल्पात समाविष्ट असलेल्या नंदूरबार जिल्ह्यातील नंदुरबार , नवापूर आणि धुळे जिल्ह्यातील धुळे, साक्री, शिंदखेडा व शिरपूर अशा एकूण सहा तालुक्यांमध्ये येणाऱ्या एकूण १०२ आश्रमशाळझंचा समावेश होतो. त्यात ४५ शासकीय आश्रमशाळा व ५७ खाजगी अनुदानित आश्रमशाळा आहेत त्यापैकी संशोधकाने प्रत्येक तालुक्यातून जवळपास २५% शाळा याप्रमाणे शासकीय १२ व खाजगी १४ अश्या एकूण २६ आश्रमशाळा यादृच्छिक पद्धतीने नमुना म्हणून निवड केली तसेच निवडलेल्या २६ आश्रमशाळांचे २६ मुख्याध्यापक व २६ अधिक्षक आणि निवडलेल्या प्रत्येक शाळेतील चार शिक्षक याप्रमाणे १०४ शिक्षक यांची निवड केली. त्याप्रमाणे निवडलेल्या २६ आश्रमशाळांमधील इयत्ता सातवीचे २५ व इयत्ता आठवींचे २५ असे एकुण २६ आश्रमशाळांमधून १३०० विद्यार्थी नमुना म्हणून घेतले.

**निष्कर्ष :**

**मुख्याध्यापकांच्या प्रश्नावलीवर आधारीत निष्कर्ष -**

१. बहुतेक शासकीय व खाजगी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना निवास सोयी व शालेय परिसराची स्वच्छता करावी लागते.

आ. मा. पाटील शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर

२. बहुतेक आश्रमशाळांमध्ये वसतिगृह अधिक्षक रात्री मुक्कामी शाळेत नसतात.

३. सर्वच शासकीय व खाजगी आश्रमशाळांमध्ये दैनिके व मासिके उपलब्ध असतात. परंतू ती मासिके बहुतेक शिक्षक व मुख्याध्यापकांच्या कपाटातच असतात. विद्यार्थ्यांना वाचण्यास मिळत नाहीत. तसेच वर्तमानपत्र ही एखादेच येते तेही मुख्याध्यापक व शिक्षकवर्ग वाचतात. विद्यार्थ्यांपर्यंत ते जातच नाही.

४. बहुतेक सर्वच शासकीय व खाजगी आश्रमशाळांमध्ये दूरदर्शन, रेडिओ इ. सुविधा आहेत असे मुख्याध्यापकांनी म्हटले असले तरी प्रत्यक्षात ही सुविधा आश्रमशाळांमध्ये दिसून आलेली नाही.

५. आश्रमशाळांमध्ये असलेल्या व्यायामशाळांमध्ये बहुतेक ठिकाणी विद्यार्थ्यांन ाव्यायामाचे तंत्रशुध्द धडे देण्यासाठी प्रशिक्षकाची नेमणूक केलेली नाही.

६. शासकीय तसेच खाजगी आश्रमशाळांमधील सर्वच विद्यार्थ्यांची नियमितपणे वैद्यकिय तपासणी केली जाते.

७. शासकीय आश्रमशाळांमध्ये निवासी विद्यार्थ्यांसाठी दैनंदिन आहाराची सुविधा शासनाकडूनच केलेली असते.

८. शासकीय आश्रमशाळांमध्ये वसतिगृहाच्या इमारती हवा, प्रकाश दृष्ट्या अनुकूल आहेत. काही खाजगी आश्रमशाळांमध्येही सिमेंटच्या पक्क्या इमारती आहेत. मात्र काही ठिकाणी पत्र्याची वा कौलारु छताची झोपडीवजा वसतिगृहे आहेत.

९. सर्वच शासकीय आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शारिरीक विकासासाठी मैदान व खेळांचे साहित्य उपलब्ध आहे.

**अधिक्षकांच्या प्रश्नावलीवर आधारीत निष्कर्ष -**

१. शासकीय तसेच खाजगी आश्रमशाळांत वेतनेतर अनुदान हे ८ ते १२ टक्के इतके अल्प प्रमाणात मिळते हे अनुदान शाळेतील विविध बाबींच्या सुधारणेसाठी अथवा साहित्य खरेदीसाठी फारच कमी आहे.

२. खाजगी आश्रमशाळांना वसतिगृहासाठी पुरेसे अनुदान मिळत नाही.

३. आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना दिली जाणारी आदिवासी भत्याची रक्कम पुरेशी आहे.

४. वसतिगृहात राहणा-या मुलींच्या संख्येत दरवर्षी वाढ होत आहे.

५. सर्वच आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना दरवर्षी दोन जोडी गणवेश शाळेमार्फतच पुरविला जातो.

६. वसतिगृहातील मुलांच्या आवडीप्रमाणे दररोज अन्नपदार्थ देणे शक्य नसते. तरी त्यांना दिला जाणारा आहार हा चौरस असतो.

**शिक्षकांच्या प्रश्नावलीवर आधारीत निष्कर्ष -**

१. सर्वच शासकीय व खाजगी आश्रमशाळांमधील शिक्षकांची नियुक्ती नियमानुसार केलेली आहे.

२. आश्रमशाळांमध्ये नियुक्त करण्यात आलेले सर्वच शिक्षक प्रशिक्षित आहेत.

३. सर्वच शासकीय व खाजगी आश्रमशाळांमधील शिक्षक शिक्षण विभागाकडून राबविल्या जाणा-या सेवांतर्गत प्रशिक्षणांना उपस्थित राहतात.

४. आश्रमशाळांमधील सर्वच शिक्षकांना नोकरी करीत असतांना बहिस्थ प्रवेश घेऊन वेगवेगळ्या पदव्या मिळवून आपली व्यावसायिक पात्रता वाढविता येते.

५. सर्वच शासकीय व खाजगी आश्रमशाळेतील माध्यमिक शिक्षकांना विषयानुरुप अध्यापन करण्याची संधी मिळते.

६. सर्वच शासकीय व खाजगी आश्रमशाळांमधील शिक्षक दैनंदिन पाठ टाचण काढतात.

७. शासकीय व खाजगी आश्रमशाळेतील बहुसंख्य शिक्षक अध्यापन करतांना काही शैक्षणिक साधनांचा वापर करतात.

८. सर्वच शासकीय व खाजगी आश्रमशाळांमधील शिक्षकांना शासनाच्या नियमानुसार पूर्ण वेतन दिले जाते.

९. शासकीय आश्रमशाळांच्या शिक्षकांचे वेतन दरमहा निश्चित अशा तारखांच्या दरम्यान होत असते. मात्र खाजगी आश्रमशाळांमध्ये वेळेवर पगार होत नाहीत.

**विद्यार्थ्यांच्या प्रश्नावलीवर आधारीत निष्कर्ष -**

१. शासकीय तसेच खाजगी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीत प्रवेश देतांना गुणवत्तेचा विचार न करता केवळ वयाचा विचार करुन प्रवेश दिला जातो.

२. सर्वच शासकीय तसेच खाजगी आश्रमशाळांमध्ये चित्रकला, संगित, क्रीडा इ. विषयांसाठी स्वतंत्र शिक्षकांची नेमणूक केलेली नाही.

३. बहुतेक सर्वच आश्रमशाळांमध्ये चित्रे, नकाशे, तक्ते, आलेख, आकृत्या इत्यादी शैक्षणिक साधने वर्गखोल्यांमध्येच टांगलेले अथवा गुंडाळी करुन ठेवलेले असतात. त्यामुळे आवश्यकतेनुरुप शिक्षक त्यांचा वापर करतात

४. आश्रम शाळांमधील सर्वच विद्यार्थी शिक्षकांनी दिलेले गृहकाम वेळेवर पूर्ण करतात

५. आश्रमशाळांमध्ये केवळ पुस्तकी शिक्षणच दिले जात नाही तर त्यासोबत शिक्षक विषयानुरुप स्पर्धा, प्रदर्शने इत्यादी अभ्यासपूरक उपक्रमांचेही आयोजन करतात. मात्र या उपक्रमांचे प्रमाण खाजगी आश्रमशाळांच्या मानाने शासकीय आश्रमशाळांमध्ये कमी दिसते.

६. शिक्षकांच्या चांगल्या कामाबद्दल विद्यार्थ्यांसमोर मुख्याध्यापकांकडून गौरव होण्याचे प्रमाण शासकीय आश्रमशाळांमध्ये कमी आहे.

७. बहुतेक शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची काही निवासस्थाने सालेय परिसरातच बांधण्यात आलेली आहेत. मात्र सर्वच शासकीय आश्रमशाळांवर शिक्षक निवासी असतात असे नाही. तर बहुतेक खाजगी आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची निवासस्थाने स्वतंत्रपणे बांधलेली नाहीत.

८. शासकीय आश्रमशाळेतील वसतिगृहांमध्ये आरोग्याच्या दृष्टीने निवासाची पुरेशी सुविधा आहे मात्र त्यामानाने ब-याचश्या खाजगी आश्रमशाळांमध्ये वसतिगृहातील विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था वर्गातच आहे.

**निरीक्षणावर आधारित निष्कर्ष -**

विवध आश्रमशाळांना दिलेल्या भेटी, प्रत्यक्ष निरीक्षण, मुख्याध्यापकांशी व शिक्षक मित्रांशी केलेल्या चर्चा व तज्ञांच्या मुलाखती घेतल्यानंतर काही सर्वसाधारण निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

१. रात्री विद्यार्थ्यांची काळजी घेण्यासाठी एक शिक्षक व एक चतुर्थश्रेणी कर्मचारी शाळेत उपस्थित असतात.

२. प्रत्येक शासकीय आश्रमशाळेवर दैनिक वर्तमानपत्रे मागविली जात नाहीत.

३. प्रत्येक आश्रमशाळांना शासनाने दूरदर्शन संच उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या अभिरुचीचा विकसनासाठी विविध मनोरंजनाचे कार्यक्रम पाहता येतात.

४. सर्वच शासकीय व खाजगी आश्रमशाळांमध्ये स्वतंत्र अशी व्यायामशाळेची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ मैदानी खेळांवरच अवलंबून राहावे लागते.

५. सर्वच आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांवर कामाचा बोजा जास्त असतो त्यामुळे त्यांच्या विषयाचे अध्यापन पूर्ण होत नाही अथवा इतर शिक्षकांकडून करवून घेतले जाते.

६. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना शिक्षणात फारसा रस नाही. त्यामुळे ते स्वयंस्फुर्तपणे अध्ययन करीत नाहीत.

७. आश्रमशाळांमध्ये विज्ञानाच्या प्रयोगशाळा आहे. मात्र त्यात असलेले साहित्य फारच जूने व टाकावू आहे.

८. गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने अन्य तज्ञ व्यक्तिंना बोलावून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे प्रमाण फारच कमी आहे.

९. प्रत्येक शासकीय आश्रमशाळेला शासनाकडून ६ - ७ संगणक संच दिलेले आहेत. जेणेकरुन आदिवासी विद्यार्थी संगणकसाक्षर होतील. मात्र शासनाने स्वतंत्र संगणक शिक्षकाची नियुक्ती केलेली नाही.

१०. आश्रमशाळांचे वेळापत्रक दोन सत्रात असते. सकाळी ९ ते १२ तासिका, त्यानंतर १२ ते १.३० जेवण, नंतर १.३० ते ४.३० पुन्हा वर्ग भरतात. त्यामुळे विशेष तयारी वर्ग घेतले जात नाहीत.